नगरसचिव कार्यालय
पुणे महानगरपालिका
दिनांकः-२८/१०/२०२०

**-:परिपत्रः-**

**पुणे महानगरपालिका मुख्य सभेच्या कामकाजाच्या नियमापैकी नियम क्र. १ (के) अन्वये मंगळवार, दि.२०/१०/२०२० रोजी दुपारी ३:०० (तीन) वाजता भरलेल्या माहे ऑक्टोबर २०२० या मासिक सभेच्या कार्यपत्रिकेवर तातडीचे म्हणून दाखल करुन घेण्यात आलेले विषय.**

विषय क्र.१/१३४

संदर्भ - १) मा.स्थायी समिती ठराव क्र. २०४२ दि.३१/३/२०१८
२) मा.स्थायी समिती ठराव क्र. ७५३ दि.१९/८/२०१९
३) मा.मुख्य सभा ठराव क्र. ३११ दि. २८/८/२०१९
४) विधी विभाग, पुणे महानगरपालिका यांचे दि. ११/८/२०२० रोजीचे जा.क्र.-६८७ चे पत्र.
५) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/२३४ दि. १७/८/२०२० चे पत्र.
६) मा.स्थायी समिती ठराव क्र.५७६,दि.६/१०/२०२०

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून-

पुणे महानगरपालिका मा.मुख्य सभा ठराव क्र. ३११ दि.२८/८/२०१९ मधील संदर्भ क्र. ६ च्या देण्यात आलेल्या उपसूचनेनुसार पुणे महानगरपालिका वैद्यकीय शिक्षण ट्रस्टवर सर्व पक्षनेत्यांचा समावेश करणेस व सभासद वाढविणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

विषय क्र.२/१३५

संदर्भ - १)मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/मा.व्य/१२२५,दि.१६/३/२०२० चे पत्र.
२)मा.धनराज घोगरे व मा.आनंद रिठे यांची दि.२६/६/२०२० ची उपसूचना
३) शहर सुधारणा समिती ठराव क्र.२६,दि.२६/६/२०२०
४) मा.स्थायी समिती ठराव क्र.५७७,दि.६/१०/२०२०

-----

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून -

पुणे महापालिकेमार्फत बांधणेत आलेल्या बहुउद्देशिय हॉलच्या (मल्टीपर्पज हॉल) विनियोगाबाबतचे खाली नमूद केलेल्या धोरणास (पॉलिसी) मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे

**पुणे महानगरपालिका**

बहुउद्देशीय हॉल (मल्टीपर्पज हॉल) वापरावयाच्या अटी शर्ती

बहुउद्देशीय हॉल (मल्टीपर्पज हॉल) विनियोगाबाबतच्या अटी /शर्ती. मा.उप आयुक्त, सांस्कृतिक केंद्रे यांच्या नियंत्रणाखाली असतील. त्याबाबतची अंमलबजावणी मा.उप आयुक्त, सांस्कृतिक केंद्र यांनी करावयाची आहे. तसेच अटी/शर्ती मध्ये आवश्यकतेनुसार बदल/वाढ/रद्द करणे बाबतचे सर्व अधिकार मा. महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना राहतील. अटी/शर्ती बाबत वाद निर्माण झाल्यास मा. महापालिका आयुक्त यांचा निर्णय अंतिम राहील.

## परिशिष्ट ''अ'' – उपलब्धता (वापर)

१.१. पुणे महापालिकेमार्फत बांधणेत आलेले बहुउद्देशीय हॉलहे नाटयप्रयोग,सांस्कृतिक कार्यक्रम/ जादूचे प्रयोग/परिषद/स्नेहसंमेलन/करमणूकीचे कार्यक्रम,रंगीत तालीम, मेळावे,वाढदिवस, बारशे, लग्न समारंभ, मुंज, साखरपुडा,रिसेप्शन,सभा वअनुषंगिक कार्यक्रमांसाठी नियमानुसार भाडे भरून उपलब्ध करून देणेत येतील

१.२.सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये कोणकोणत्या कार्यक्रमांचा समावेश असेल या संबंधीत अंतिम निर्णय मा.उपआयुक्त, सांस्कृतिक केंद्रे यांचा राहील.

१.३. व्यक्ती, नाटककार , संस्था, वाद्यवृंद समुह, नोंदणीकृत सेवाभावी संस्था, प्रतिष्ठान, क्लब, मंडळ, सार्वजनिक/सांस्कृतिक संस्था इत्यादींना बहुउद्देशीय हॉल कार्यक्रमासाठी योग्य ते शुल्क आकारून उपलब्ध करून देणे अथवा नाकारणे याबाबतचे सर्व अधिकार मा.उप आयुक्त, सांस्कृतिक केंद्रे यांना राहतील.

१.४. बहुउद्देशीय हॉल दररोज सकाळी ८.०० ते ३.००. दु.३.०० ते १०.०० या काळात उपलब्ध राहील. तसेच संपूर्ण दिवसाकरिता सुद्धा उपलब्ध करून देण्यात येईल.

## परिशिष्ट ''ब'' – आरक्षण

२.१. बहुउद्देशीय हॉलच्या मागणीचा लेखी अर्ज केल्यावर अर्जदारास तारखा देणे अथवा नाकारणे या बाबतचे सर्व अधिकार मा.उप आयुक्त, सांस्कृतिक केंद्रे यांना राहतील.

२.२. जी संस्था अथवा अर्जदार सर्वप्रथम मागणी करेल, अशा संस्था अथवा अर्जदार यांना प्राधान्य देणेत येईल. यासाठी कोणाचीही शिफारस अथवा वाढीव फी विचारात घेतली जाणार नाही.

२.३.शासकीय,निमशासकीय व पुणे मनपाच्या आकस्मित कार्यक्रमासाठी पूर्वीचा आरक्षित कार्यक्रम रद्द केला गेल्यास, सदर संस्थेस अर्जदारास २४ तास अगोदर याबाबत अवगत करणेत येवून जमा केलेली सर्व रक्कम परत करणेत येईल.

२.४. कार्यक्रमाच्या आरक्षणासाठी मा.उपआयुक्त, सांस्कृतिक केंद्रे या नावाने किमान १५ दिवस अगोदर लेखी अर्ज केला पाहिजे. अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे जोडणे गरजेचे आहे.

२.५. बहुउद्येशीय हॉलचे शुल्क, अनामत रक्कम व इतर कर कार्यक्रमापूर्वी पुणे महापालिकेच्या सांस्कृतिक केंद्रे विभागाकडे जमा करणे आवश्यक आहे. त्याखेरीज कार्यक्रमास बहुउद्येशीय हॉल उपलब्ध करून देणेत येणार नाही.

२.६. संपूर्ण भाडे व अनामत रक्कम भरल्याशिवाय आरक्षण मान्य झाल्याचे गृहीत धरता येणार नाही.

२.७. जादा जागा, वीज इत्यादी वापरासाठी मान्य दराने अलाहिदा शुल्काची आकारणी केली जाईल.

२.८. अर्जदाराकडून ठरवून दिलेल्या नियमाचा भंग झाल्यास पुढील वेळी हॉल उपलब्ध करून दिला जाणार नाही. त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात येईल तसेच तीन वेळा भंग केल्यास त्यांना काळ्या यादीत समाविष्ट करण्यात येईल.

२.९. आरक्षण मागणी अर्ज नाकारणे, आरक्षण रद्द करणे, तसेच अर्जामध्ये दिलेली माहिती खोटी आहे असे सिध्द झाल्यास मान्य आरक्षण रद्द करण्याचे अधिकार मा.उपआयुक्त, सांस्कृतिक केंद्रे यांना राहील.

२.१०. अर्जदारास पुढील वाढीव सत्राची आवश्यकता असेल, त्यासाठी अन्य मागणी नसल्यास पुढील संपूर्ण सत्राचे भाडे शुल्क आदा करावे लागेल. त्यासाठी संपूर्ण दिवसाच्या भाड्याची सवलत मिळणार नाही.

### आरक्षित तारखेस कार्यक्रम होऊ शकत नसल्यास

३.१.अपरिहार्य कारणास्तव आरक्षित तारखेस कार्यक्रम होऊ शकत नसल्यास, अर्जदार/संस्था यांनी आरक्षित तारखेपूर्वी कामकाजाच्या ०५ दिवस कार्यालयीन कालावधीत लेखी पत्राने सूचित करणे बंधनकारक राहील. तदनंतर अर्ज प्राप्त झाल्यास जागेचे शुल्क व अनामत रक्कम ५०% कापून परत करण्यात येईल.

३.२. आरक्षण शुल्क जमा न केल्यास, तसेच मान्य मुदतीपेक्षा जादा वापर केल्यास व त्यामुळे बहुउद्देशीय हॉलचा वापर पुढील कार्यक्रमासाठी न झाल्यास होणारे नुकसान भाडे आकारून अथवा अनामत रकमेतून वजावट करण्यात येईल.

## परिशिष्ट ''क''

### अनामत, शुल्क व परतावा

४.१.अनामत रक्कम भाड्याच्या ५०% इतकी राहील.तसेच र.रु.१०००/- इतके सफाई शुल्क वेगळे

आकारणेत येईल.

४.२.बहुउद्देशीय हॉलचा ताबा घेताना भाड्याचे शुल्क व अनामत रक्कम भरणा केलेची पावती दाखविणे आवश्यक आहे.अनामत रकमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज किंवा अन्य फायदे देय असणार नाही.

४.३. अर्जदाराच्या लेखी विनंतीनुसार अनामत रक्कम पुढील आरक्षणासाठी राखून ठेवण्यात येईल.

४.४.कार्यक्रमानंतर अर्जदाराच्या अधिकृत लेखी अर्जानुसार अनामत रक्कम संबंधितास परत करता येईल.त्यासाठी अर्जासोबत अनामत रक्कम भरणा केलेची मूळ पावती जोडणे आवश्यक आहे.

४.५.नुकसान भरपाई, जादा आकारणी शुल्क व इतर येणे जमा न झाल्यास अशा रक्कमेची अनामत रक्कमेतून वजावट करण्यात येईल.

४.६. मा.राष्ट्रपती, मा.पंतप्रधान. मा.मुख्यमंत्री, मा. पालक मंत्री मा. महापौर यांच्या तसेच नैसर्गिक आपत्ती, मतदानासारख्या अत्यावश्यक कार्यक्रमासाठी बहुउद्देशीय हॉलला प्राधान्य देणेत येतील.

अर्जदारास याबाबत अवगत करणेत येवून जमा केलेली सर्व रक्कम परत करणेत येईल.

## परिशिष्ट ''इ''– इतर

१) कार्यक्रमाचे जाहिरातीचे फलक आरक्षित दिनांकापूर्वी ४ दिवस अगोदर बहुउद्येशीय हॉलच्या आवारात ठरवून दिलेल्या जागी प्रदर्शित करता येतील

२) सेमिनार, संमेलन, प्रवचने, नाटय इत्यादी तत्सम कार्यक्रमांसाठी माईक, स्पीकर, साऊंड मिक्सर सह ध्वनी व्यवस्था व लाईट व्यवस्था संबंधीतांस करावी लागेल. सामान नेणे, आणणे, त्यांची सुरक्षितता त्याची जबाबदारी पुणे महापालिकेची असणार नाही.

३) उपलब्ध वीजभारापेक्षा अधिक जादा वीजभार कार्यक्रमासाठी आवश्यकता असल्यास सदर संस्थेने स्वखर्चाने त्या क्षमतेचा जनरेटर आणून वापर करणे बंधनकारक राहील.

४) मोठया कालावधीसाठी वीज पुरवठा व जनरेटर व्यवस्था खंडीत झाल्यामुळे कार्यक्रम होऊ शकला नाही व त्यामुळे संबंधिताना बहुउद्येशीय हॉलचा वापर करता येऊ न शकल्यास त्यांना भाडे परताना केले जाणार नाही.

५) संस्थेस स्वतःचे लाईट सामान वापरण्याची सवलत आहे. त्याची सुरक्षितता (जबाबदारी) पुणे महापालिकेची असणार नाही. कार्यक्रमाचे व्हिडीओ रेकॉर्डिंग, टेप रेकॉर्डिंग मा.उपआयुक्त , सांस्कृतिक केंद्रे यांचे पूर्वपरवानगीने करता येईल. संस्थेस स्वतःची स्टेज प्रॉपर्टी वापरण्याची सवलत राहील. तथापि सामान नेणे, आणणे, त्यांची सुरक्षितता त्याची जबाबदारी त्यांचेवर राहील.

६) कार्यक्रमासाठी लागणारे साहित्य सतरंजी, समई, इलेक्ट्रिक फॅन, तांब्या भांडे इत्यादी सह इतर आवश्यक साहित्य संबंधीताने स्वखर्चाने स्वतःचे जबाबदारीवर आणावयाचे आहे. हे साहित्य मनपाकडून उपलब्ध करून दिले जाणार नाही.

७) बहुउद्देशीय हॉलच्या परिसरात धुम्रपान, मद्यपान करण्यास सक्त मनाई आहे. या नियमाचा भंग झाल्यास प्रसंगी चालू असलेले कार्यक्रम बंद करून त्यांचेवर रितसर कारवाई करणेत येईल. या गैरवर्तनाबद्दल संबंधीत संस्था, कलाकार, व्यक्ती यांना पुढील कार्यक्रमासाठी उपलब्ध करून दिले जाणार नाही व अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

८) बहुउद्देशीय हॉलमधील कार्यक्रमाच्या व्यवस्थेसाठी अर्जदाराने व्यक्तीची अगर संस्थेची नेमणूक केली असेल तर त्याची माहिती पुणे मनपास उपलब्ध करावी.

९) बहुउद्देशीय हॉलमध्ये व परिसरात अन्न शिजविणेस कोणासही परवानगी दिली जाणार नाही.

१०) वाद्यवृंद समुह, लोकनाटय, लावणी, पत्रकार परिषद वा अन्य कार्यक्रमाच्या वेळी प्रेक्षागृहात गडबड गोंधळ होऊ नये यासाठी संबंधीत व्यक्ती अथवा अर्जदार संस्था यांनी पोलीस मदतीची/ सुरक्षा व्यवस्थेची नियोजन करणे आवश्यक आहे.

११) रात्री १० नंतर ध्वनीवर्धक, ध्वनीक्षेपक, लाऊडस्पीकर वापरण्यास बंदी असेल.

१२) तिकिट विक्री (बुकींगसाठी) काऊंटर कार्यक्रमाचे दिवस धरून ४ दिवस अगोदर वापरता येईल.

१३) प्रवेशद्वाराचे कमानीवरील जाहिरातीस आकाश चिन्ह विभागाची परवानगी व शुल्क भरणे आवश्यक आहे.

१४) मुख्य प्रवेश व्दाराजवळ वाहतूक कोंडी होऊ नये याची खबरदारी संबंधित अर्जदाराकडून घेणेत यावी.

१५) इमारतीस तसेच रंगमंच इत्यादींचे भिंतीस ,फर्निचरला खिळे ठोकणे यास मनाई आहे.

१६) बहुउद्देशीय हॉलचा वापर करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस इजा झाल्यास अगर कोणताही वाद निर्माण झाल्यास त्यांचे नुकसान झाल्यास, त्याची तोषीस पुणे महापालिकेस असणार नाही.

१७) बहुउद्देशीय हॉलची देखरेख करणाऱ्या म.न.पा. सेवकास बक्षिस (टिप) देण्यात येऊ नये.

१८) बहुउद्देशीय हॉल पूर्वतयारीसाठी कार्यक्रमापूर्वी एक तास अगोदर ताब्यात देणेत येईल व कार्यक्रम झालेनंतर अर्ध्यातासामध्ये संबंधितानी सदरचा हॉल स्वच्छ व पूर्ववत करून पुणे मनपाच्या ताब्यात देणे अनिवार्य आहे.

१९) अर्जदाराने कार्यक्रमाचे वेळापत्रक काटेकोरपणे पाळणे आवश्यक आहे.

२०) इमारत, फर्निचर, खुर्च्या, फीटींग्ज, वीजेची उपकरणे अगर अन्य साधनसामुग्री यांची मोडतोड झाल्यास संबंधीतांकडून जरूर ती भरपाई वसूल केली जाईल. अशी नुकसान भरपाई भरण्यास कुचराई केल्यास सदर रक्कम अनामत रकमेतून वसूल केली जाईल व संबंधीतांना बहुउद्देशीय हॉल उपलब्ध करून देता येणार नाही.

२१) आवश्यक असलेले सर्व परवाने अर्जासोबत अथवा कार्यक्रम सुरु होणे पूर्वी पुणे मनपास सादर करावेत. सादर न केलेस सदर हॉल उपलब्ध करून देणेत येणार नाही. तसेच शुल्क व अनामत रक्कम जप्त करून घेणेत येईल.

२२) बहुउद्देशीय हॉलच्या वापरासाठी अर्ज नाकारणे, आरक्षण रद्द करणे, तसेच अटी/शर्तीचा भंग केल्यास व अर्जात खोटी माहिती दिली असल्याचे आढळून आल्यास दिलेले आरक्षण रद्द करण्याचा अधिकार मा.उप आयुक्त, सांस्कृतिक केंद्रे यांना राहील.

२३) बहुउद्देशीय हॉल रात्री १०.०० ते सकाळी ८.०० वाजेपर्यंत बंद करण्यात येईल. या बाबत प्रशासन अधिकारी यांच्याशी वाद घालू नये.

२४) बहुउद्देशीय हॉलच्या आवरात मा.उप आयुक्त, सांस्कृतिक केंद्रे यांच्या परवानगी शिवाय कोणतेही सामान ठेवण्यात येऊ नये अथवा परिसर अस्वच्छ करू नये.

२५) शनिवार व रविवार या दिवशी सांस्कृतिक कार्यक्रमांना प्राधान्य देण्यात येईल.

**परिशिष्ट ''ई ''शुल्क आकारणी**

**प्रस्तावित**

**संदर्भ क्र.२ च्या उपसूचना प्रमाणे-**

पुणे महानगरपालिकेमार्फत बांधण्यात आलेल्या बहुउद्देशिय हॉलच्या विनियोगाकरिता नाट्यप्रयोग,सांस्कृतिक कार्यक्रम,जादूचेप्रयोग,परिषद,स्नेहसंमेलन,करमणुकीचेकार्यक्रम,रंगीत तालीम,मेळावे,वाढदिवस,बारसे,लग्न,मुंज, साखरपुडा,रिसेप्शन,सभा व अनुषंगिक कार्यक्रमासाठी खालीलप्रमाणे शुल्क आकारण्यास.

| अ.क्र. | बहुउद्देशिय हॉलचे क्षेत्रफळ | प्रतिसत्र शुल्क | संपूर्ण दिवस शुल्क |
|---|---|---|---|
| १ | १०० चौ.मी.पर्यत | र.रु.३०००/- | र.रु.५०००/- |
| २ | २०० चौ.मी.पर्यत | र.रु.४५००/- | र.रु.८०००/- |
| ३ | ३०० चौ.मी.पर्यत | र.रु.६०००/- | र.रु.१०,०००/- |
| ४ | ४०० चौ.मी.पर्यत | र.रु.८५००/- | र.रु.१२०००/- |
| ५ | ४०१ चौ.मी.पर्यत | र.रु.१०५००/- | र.रु.१५०००/- |

उपरोक्त नमूद क्षेत्राच्या बहुउद्देशिय हॉलचा वापर विषयपत्रामध्ये नमूद कारणाव्यतिरीक्त ३ दिवसांपेक्षा जास्त कालावधीपेक्षा मागणी केल्यास मूल्यांकनानूसार येणारे भाडे आकारणी करून निविदा पध्दतीने वाटप करणेस.

टीप-:

१) बहुउद्देशीय हॉलमध्ये पार्किंग सुविधा उपलब्ध असेल तर र.रु.१,०००/- इतके ज्यादा शुल्क आकारण्यास.

२) सफाई शुल्क म्हणून र.रु.१,०००/- इतके शुल्क आकारावे.

३) वरील शुल्का व्यतिरिक्त ५० % रक्कम अनामत तसेच नियमानुसार जी.एस.टी. रक्कम आकारण्यास.

४) वरीलप्रमाणे सर्व शुल्क आकारणी करून सदर हॉल उपलब्ध करून देणेची सर्व जबाबदारी मा. मा.उप आयुक्त सांस्कृतिक केंद्रे यांची राहील.

५) वरील संपूर्ण नियमावलीमध्ये बदल / सुधारणा करण्याचे अधिकार मा.महापालिका आयुक्त यांचे राहतील.

विषय क्र.३/१३६

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र. मआ/क्रीडा/२४५, दि. २४/८/२०२० चे पत्र
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र. ४० दि.११/९/२०२०
३) मा.स्थायी समिती ठराव क्र.५७८,दि.६/१०/२०२०

----

मा. स्थायी समितीची शिफारस विचारात घेवून–

पुणे पेठ स.नं.६७/६८ तळजाई मंदिराजवळ जलतरण तलाव क्रीडा संकुल व मल्टीपर्पज हॉल लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावर विहित अटी व शर्तीनुसार ताबा दिनांकापासून पुढील ३ वर्षा करीता चालविणेस देणेकामी निविदा मागविल्या असता आलेल्या ३ निविदांपैकी सर्वात जास्त दर देणारे अ.क्र.१ चे निविदाधारक ज्ञानेश्वर पंढरीनाथ घनवट,तळजाई माता वसाहत,पुणे ९ यांनी देऊ केलेले मासिक भाडे र.रु.१,३०,०००/–(र.रु.एक लाख तीस हजार फक्त) म.न.पा.ने निश्चित केलेल्या मासिक भाडे रक्कमेपक्षा र.रु.४९५१/– ने अधिक दराने त्यांची निविदा स्वीकृत करणेस निविदा अटी व शर्ती नुसार निविदादारानी देऊ केलेल्या मासिक भाडे रक्कमे प्रमाणे ३ महिन्याचे भाडे अनामत रक्कम म्हणून व ३ महिन्याचे आगाऊ भाडे रक्कम स्वीकारणेस तसेच त्यांचे सोबत करारनामा करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

विषय क्र.४/१३७

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा. क्र. मआ/क्रीडा/२५७, दि.३१/८/२०२० चे पत्र
२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र. ४२ दि.११/९/२०२०
३) मा.स्थायी समिती ठराव क्र.५७९,दि.६/१०/२०२०

----

मा. स्थायी समितीची शिफारस विचारात घेवून–

पुणे पेठ कोथरुड स.नं.१४३/३,१४४/३ थोरात उद्यानातील कै.वस्ताद बलभीम मोकाटे जलतरण तलाव लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावर विहित अटी व शर्तीनुसार ताबा दिनांकापासून पुढील ३ वर्ष कालावधी करीता चालविणेस देणे कामी निविदा मागविल्या असता आलेल्या ३ निविदांपैकी सर्वात जास्त दर देणारे अ.क्र.१ चे निविदाधारक प्रबोधन विचारधारा कोथरुड,पुणे ९ यांनी देऊ केलेले मासिक भाडे र.रु.५१,५५५/– (र.रु.एकावन्न हजार पाचशे पंचावन्न फक्त) म.न.पा.ने निश्चित केलेल्या मासिक भाडे रक्कमेपक्षा र.रु.८५०५/– ने अधिक दराने त्यांची निविदा स्वीकृत करणेस निविदा अटी व शर्ती नुसार निविदादारानी देऊ केलेल्या मासिक भाडे रक्कमे प्रमाणे ३ महिन्याचे भाडे अनामत रक्कम म्हणून व ३ महिन्याचे आगाऊ भाडे रक्कम स्वीकारणेस तसेच त्यांचे सोबत करारनामा करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

विषय क्र.५/१३८

संदर्भ – १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/३०३ दि.२४/९/२०२० चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.५८२,दि.६/१०/२०२०

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून–

पुणे महापालिकेचे आरोग्य विभागाअंतर्गत असणाऱ्या सर्व दवाखाने/रुग्णालये/प्रसूतिगृहे या ठिकाणी देण्यात येणारी आरोग्य सेवा सुविधा दि.३०/११/२०२० अखेरपर्यंत मोफत करण्याची मुदत वाढवून देणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

<u>विषय क्र.६/१३९</u>

संदर्भ - १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/विद्युत/३०५ दि.२८/९/२०२० चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.५९४,दि.६/१०/२०२०

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून-

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३) क मधील तरतूदीच्या अनुषंगाने कोरोना विषाणु प्रतिबंधात्मक उपाय योजने अंतर्गत उद्भवलेल्या आपत्कालिन परिस्थितीमध्ये पुणे मनपाच्या हद्दीत कोरोना (कोविड-१९) या विषाणुच्या संसर्गामुळे मृत पावलेल्या व्यक्तींवर अत्यावश्यक असलेल्या सेवकांकडून, मनपाचे निश्चित केलेल्या विद्युत/गॅस दाहिन्यांमध्ये अंत्यसंस्कार करण्याचे कामे मे.एस.ए.एन्टरप्रायझेस यांचेकडून र.रुपये१२,९८०/- प्रतिमहा प्रतिसेवक या दराने दि.९/३/२०२० ते दि.३१/७/२०२० पर्यंत कामे करण्यास व त्यापोटी र.रु. ८,८७,८३२/- पर्यंत बिल अदा करणेस व त्यानुसार आवश्यकतेनुसार त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता देण्यात आलेली असून सदरची बाब मा.मुख्य सभेच्या निदर्शनास आणणेत येत आहे.

<u>विषय क्र.७/१४०</u>

संदर्भ - १) मा.मुख्य सभा ठराव क्र. ३११ दि.२८/८/२०१९

२) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/३२५ दि.६/१०/२०२० चे पत्र.

३) मा.स्थायी समिती ठराव क्र.६०३,दि.६/१०/२०२०

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून-

भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करणे करता **पुणे महानगरपालिका व पुणे महागनरपालिका-मेडिकल एज्युकेशन ट्रस्ट** यांचे मध्ये करारनामे (एम.ओ.यु.) करणेसाठी खालील बाबीस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१. मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रामध्ये नमुद केल्याप्रमाणे एकुण ३ करारनामे (एम.ओ.यु) करणेस,

२.सर्व करारनामे (एम.ओ.यु)वर पुणे महानगरपालिकेच्या वतीने स्वाक्षरी करण्याचे अधिकार महापालिका आयुक्त यांना प्रदान करणेस,

३.या बाबत मा.मुख्य सभेची मान्यता प्राप्त होईल या भरवश्यावर कार्यवाही सुरु करणेस,

<u>विषय क्र.८/१४१</u>

संदर्भ - १) शासन निर्णय महसूल व वन विभाग सीएलएस २०००/प्र.क्र.१२३/मङ्ग ३, दि.१६/३/२०.

२) शासन परिपत्रक वित्त विभाग संकीर्ण -२०००/प्र.क्र.५९/२० कोषा प्रशा-५ दि.१८/०३/२०२०.

३) मा.जिल्हाधिकारी कार्यालय गृह शाखा क्र. पगार/कवि/४५२/२०२० दि.१६/०४/२०२०.

४) मा.अति.महा.आयुत्क (ज) कार्यालय जा.क्र.अतिमआ/साप्रवि/आस्था/६९९ दि.८/५/२०२० अन्यवे अतंर्गत श्री शिव छत्रपती क्रीडा संकुल म्हाळुंगे-बालेवाडी कोविड केअर सेंटर, पुणे करिता कर्मचारी उपलब्ध करून देनेबाबत.

५) मा.आयक्त, क्रीडा व युवक सेवा संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे अंतर्गत श्री शिव छत्रपती क्रीडा संकुल म्हाळुंगे-बालेवाडी, पुणे यांचे पत्र कोविसा/संभित/२०२०-२१/का-११दि.८/६/२०२०.

६) मा.आयक्त, क्रीडा व युवक सेवा संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे अंतर्गत श्री शिव छत्रपती क्रीडा संकुल म्हाळुंगे-बालेवाडी,पुणे यांचे पत्र कोविसा/संभित/२०२०-२१/का-११दि.२३/६/२०२०.

७) मा.आयक्त, क्रीडा व युवक सेवा संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे अंतर्गत श्री शिव छत्रपती क्रीडा संकुल म्हाळुंगे-बालेवाडी, पुणे यांचे पत्र कोविसा/संभित/२०२०-२१/का-११/४७४९ दि.३०/६/२०२०.

८) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.२/३१५ दि.५/१०/२०२० चे पत्र.

९) मा.स्थायी समिती ठराव क्र.६१४,दि.६/१०/२०२०

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून-

कोरोना प्रतिबंधक उपाय योजने अंतर्गत श्री शिवा छत्रपती क्रीडा संकुल म्हाळुंगे-बालेवाडी कोविड केअर सेंटर, पुणे महानगरपालिकेचे कोविड सेंटर साठी महाराष्ट्र महानगरपालिका प्रांतिक अधिनियम क्र.६७ (३) क अन्वये कोरोना विषाणूच्या संसर्गाच्या प्रादुर्भावाच्या अनुषंगाने निर्माण झालेल्या आपत्कालीन परिस्थितीमध्ये तातडीने करण्यात येत असलेल्या पाणीपुरवठा इमारत देखभाल दुरुस्ती व संरक्षक कुंपण या कामासाठी कोथरुड-बावधन क्षेत्रीय कार्यालयामार्फत करण्यात येत असलेल्या कामासाठी देयक अदा करणेसाठी मे.सागर सोमनाथ यादव या संस्थेला र.रु. ४६,५५,६७६=७२ इतक्या रकमेपर्यंत विना करार व अनामत रक्कम भरुन न घेता देयके अदा करण्यात येणार आहे तसेच सदरचे देयक सन २०२०-२१ चे अंदाजपत्रक कोविड १९ विषाणूमुळे पसरलेली रोगराई नियंत्रित करणे, महसुली कामांसाठी RE 17F 257, COVID- 19 अंतर्गत अत्यावश्यक महसूली कामासाठी खर्च या अर्थशिर्षकातून अदा करण्यात येणार आहे.

सदरची बाब मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे.

<u>विषय क्र.९/१४२</u>

संदर्भ - १) साथरोग अधिनियम १८९७ ची अमलबजावणी सुरू झाल्याबाबतची अधिसुचना दि.१३/०३/२०२०.
२) महाराष्ट्र कोविड १९ उपाययोजना नियम २०२०.
३) केंद्रीय आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५.
४) महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३)(क)
५) मा.महापालिका आयुक्त कार्यालयाकडील जावक क्र. ५१७ दि.१७/४/२०२० चे पत्र.
६) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.४/३१६ दि.५/१०/२०२० चे पत्र.
७) मा.स्थायी समिती ठराव क्र.६१५,दि.६/१०/२०२०

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून-
प्रभाग क्र. ३८ मधील चैत्रबन झोपडपट्टीमधील सार्वजनिक शौचालयाचे दैनंदिन साफसफाईचे काम अत्यावश्यक म्हणून मे.शारदा सर्व्हिसेस यांचेकडून करुन घेणेसाठी खालील बाबी मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे.

१) पुणे महानगरपालिका झोन क्र. ४ महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालय कोंढवा-येवलेवाडी अंतर्गत कोविड-१९ अंतर्गत प्रभाग क्र. ३८ मधील चैत्रबन झोपडपट्टीमधील सार्वजनिक शौचालयाचे दैनंदिन साफसफाई करणेबाबत

सन २०२०-२१ चे अंदाजपत्रक
महसुली कामांसाठी - RE17F 257
Covid – 19 अंतर्गत आवश्यक महसुली कामांसाठी (खर्च)

२) मे.शारदा सर्व्हिसेस यांचेकडून दि.२६/६/२०२० पासून काम करुन घेणेस पश्चात मान्यता व त्यांचेशी करारनामा करुन झालेल्या कामाचे बिल अदा करणेस

३) वरील अ.क्र. १ व २ ची अंमलबजावणी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) (क) नुसार सदरचे काम संपेपर्यंत करणेस

<u>विषय क्र.१०/१४३</u>

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. मआ/घकव्यका/१८८३ दि.३१/८/२०२० चे आदेश.
२) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/घनकचरा/३३५ दि.६/१०/२०२० चे पत्र.
३) मा.स्थायी समिती ठराव क्र.६१६,दि.६/१०/२०२०

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून-

कोविड १९ संसर्गाच्या पार्श्वभुमीवर पुणे शहर पोलिस विभागामार्फत मास्क सक्तीच्या दंडात्मक कारवाई करुन १००% महसूलापैकी ५०% महसूल पुणे महानगरपालिकेस व ५०% महसूल पुणे शहर पोलिस यांना वर्ग करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

विषय क्र.११/१४४

संदर्भ - १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मुले/२५३ दि. २७/८/२०२० चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.६२६,दि.१५/१०/२०२०

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून-

महाराष्ट्र राज्य सरकार व म्युनिसिपल कर्जरोखे धारण करणार यांचे माहितीकरीता दि. ३१/३/२०१९ अखेर पुणे महानगरपालिकेने देणे असलेल्या कर्ज/कर्जरोखेच्या रकमांचे व कर्ज/कर्जरोखे बाकीसंबंधी इतर माहिती दर्शविणारे तक्ते सरकारी गॅझेटमध्ये प्रसिध्द करणेस व त्यांच्या प्रती महाराष्ट्र सरकार व मा.अकौंटंट जनरल, मुंबई यांचेकडे पाठविण्याची अलहिदा तजवीज करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

विषय क्र.१२/१४५

संदर्भ - १.एलए-५३४ अन्वये सुरू करणेत आलेला भूसंपादन प्रस्ताव.

२.मा.स्थायी समिती ठ.क्र.२५०६ दि.१७/०२/२०१९.

३.मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/माव्य/१३३५ दि.११/०३/२०१९ चे विषयपत्र.

४.मा.वि.भू.सं.अ.क्र.१६,पुणे यांचेकडील जा.क्र.मनपा पत्रव्यवहार/३१दि.१४/०१/२०२० चे पत्र.

५.वि.भू.सं.अ.क्र.१६यांचे कडील एलए-५३४/चांदणी चौक/१८ दि.२४/०९/२०२०अन्वयेचे पत्र.

६.मा.सह सचिव,नगर विकास विभाग यांचेकडील क्र.नगरो-२०१८/प्रक्र.३५२/नवि-३३ दि.१७/०९/२०२० चे पत्र.

७.मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र. मआ/भूसंपादन/३१८ दि.५/१०/२०२० चे पत्र.

८.मा.दिपक पोटे व मा.राजेंद्र शिळीमकर यांची दि.१५/१०/२०२० ची उपसूचना

९.मा.स्थायी समिती ठराव क्र.६२९,दि.१५/१०/२०२०

----

मा.अति.महा.आयुक्त (ज) यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून तसेच स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

चांदणी चौक येथील उड्डाणपुल प्रकल्पामुळे बाधित होणा-या मिळकतींचे भूसंपादन कायदयान्वये संपादन करणेसाठी मोबदला रक्कम मा.जिल्हाधिकारी,पुणे यांचेकडे जमा करणेसाठी र.रु.६०,००,००,०००/- (अक्षरी र.रु.साठ कोटी फक्त) तात्पुरत्या स्वरुपात खालीलप्रमाणे वर्गीकरणाने उपलब्ध करुन देणेस तसेच मे.राज्य शासनाकडून सदरची रक्कम उपलब्ध झाल्यानंतर मुळ अर्थशिर्षकावर समायोजित (Recoupe) करुन देणेसाठी मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अ.क्र | अर्थशिर्षक | कमी करावयाची रक्कम | वर्गीकरण करावयाची र.रु. |
|---|---|---|---|
| १ | १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र.९८, अ.क्र.५, शहरात रस्ते विकसित करणे, (यादी क्र. ए-६),पान क्र. १९६, अ.क्र.१८९ CE20A 1249/A6-211 पुणे शहरातील एच.सी.एम.टी.आर रस्ते विकसित करणे. | र.रु.२४,००,००,०००/- | |
| २ | १०.ख.वाहतूक नियंत्रण विभाग, पान क्र. १००, अ.क्र. २, शहरामधील चौकांची सुधारणा/ विकास कामे करणे वाहतुक सुधारण्यासाठी विविध विकास कामे करणे, (यादी क्र. टी-२), पान क्र. २१५, अ.क्र. ३, CE20B102/T2-2, थेट खरेदी पध्दतीने ८०० बसेस खरेदी करणे (पुणे मनपा हिस्सा : ६०%) | र.रु.३६,००,००,०००/- | |
| १ | नविन सुचविलेले काम - चांदणी चौक उड्डाणपुलासाठी संपादित करावयाच्या मिळकतींसाठी मोबदला आदा करणे. | | र.रु.६०,००,००,०००/- |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

विषय क्र.१३/१४६

संदर्भ - १) शासन निर्णय क्र.एनयुआर/२०१३/प्रक्र३३८/नवि-३३,दि.१८/०२/२०१४.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.११३ दिनांक २८/०४/२०२०.

३) पीएमपीएमएल/मुलेविअ/१२९४ दि.११/०९/२०२०.

४) पीएमपीएमएल/मुलेविअ/१५५१ दि.१८/०९/२०२०

५) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मुले/३३३ दि.६/१०/२०२० चे पत्र.

६) मा.स्थायी समिती ठराव क्र.६३०,दि.१५/१०/२०२०

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून तसेच स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

पुणे महानगर परिवहन महामंडळास सन २०२०-२१ या चालू वर्षातील संचलन तुट अपवादात्मक बाब असल्याने उचल स्वरूपात आदा करणेसाठी खालील बाबीस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१. पुणे महानगर परिवहन महामंडळास सन २०२०-२१ या चालू वर्षातील माहे जून २०२० पर्यंतची संचलन तुट अपवादात्मक बाब म्हणून चालू वर्षी उचल अतिरिक्त स्वरूपात रक्कम रु.६३ कोटी SE19A101- ठ इतर खर्चासाठी उचल (advance)" मधून अदा करणेस,

२. मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रामध्ये नमुद केलेल्या संदर्भ क्र.४ ने जुलै २०२० ते सप्टेंबर २०२० पर्यंतची मागणी केलेली अतिरिक्त संचलन तुट रक्कम रु. ४७ कोटी व सदरची परिस्थिती कायम राहिल्यास मार्च २०२१ पर्यंतचे PMPML ची संचलन तुट आवश्यकतेनुसार अदा करणेचे अधिकार मा.महापालिका आयुक्त यांना सुपूर्त करणेस,

३. PMPML संस्थेस चालू वर्षी अदा करण्यात आलेली एकूण उचल रक्कम पुणे मनपाच्या सन २०२१-२२ च्या अंदाजपत्रकातील संचलन तुट च्या अर्थशिर्षकामधून परत जमा (Recoupment) करून घेणेस,

४. वरील रकमेपैकी रुपये ३० कोटी त्वरीत आदा करणेस व पुढील ३० कोटी आदा करण्यापुर्वी मा.स्थायी समितीच्या निदर्शनास आणून आदा करणेस,

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

विषय क्र.१४/१४७

संदर्भ - १.साथरोग अधिनियम १८९७ ची अंमलबजावणी सुरु झाल्याबाबतची अधिसूचना दि.१३/०३/२०२०

२.महाराष्ट्र कोविड-१९ उपाययोजना नियम २०२०.

३. केंद्रीय आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५.

४. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, कलम ६७ (३)(क)

५. मे.सागर वॉटर मॅनेजमेंट ॲण्ड सर्व्हीसेस यांचे दि.०७/०७/२०२० रोजीचे पत्र.

६. मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/प.क्र.४/३५९ दि.१३/१०/२०२० चे पत्र.

७. मा.स्थायी समिती ठराव क्र.६७५,दि.२०/१०/२०२०

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून -

हडपसर-मुंढवा क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत कोरोना प्रतिबंधात्मक उपाय योजने अंतर्गत करण्यात येणाऱ्या सूक्ष्म प्रतिबंधित क्षेत्र बंद करणे व तदनुषंगिक कामे करणेसाठी ठेकेदार मे.सागर वॉटर मॅनेजमेंट ॲण्ड सर्व्हीसेस यांचेकडून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३)(क) अन्वये नेमणूक करणेस मान्यता मिळणेसाठी,तसेच खालील बाबी मा.मुख्य सभेच्या निदर्शनास आणणेत येत आहे.

१) मे.सागर वॉटर मॅनेंजमेंट ॲण्ड सर्व्हीसेस यांचेकडून दि. ०७/०७/२०२० रोजीपासून सदरचे काम करून घेणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करणेस.

२) मे.सागर वॉटर मॅनेंजमेंट ॲण्ड सर्व्हीसेस यांचेकडून दि. ०७/०७/२०२० रोजीपासून करण्यात आलेल्या कामाचे बिल वेळोवेळी अदा करणेस.

३) सदर काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३) (क) नुसार दि. ०७/०७/२०२० रोजी पासून सुरू करून सदरचे काम संपेपर्यंत काम करून घेणेस

विषय क्र.१५/१४८

संदर्भ – १) साथरोग अधिनियम१८९७ ची अमलबजावणी सुरू झाल्याबाबतची अधिसुचना दि.१३/०३/२०२०.
२) महाराष्ट्र कोविड-१९ उपाययोजना नियम २०२०.
३) केंद्रीय आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५.
४) महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३)(क)
५) दि.१/७/२०२० रोजी मा.अति.महा.आयुक्त यांनी केलेली पाहणी
६) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/प.क्र.४/३६० दि.१३/१०/२०२० चे पत्र.
७) मा.स्थायी समिती ठराव क्र.६७६,दि.२०/१०/२०२०

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून -

पुणे महानगरपालिका झोन क्र. ४ कोंढवा-येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत कोविड-19 अंतर्गत विलगीकरण कक्ष, कोविड केअर सेंटर व आवश्यक ठिकाणी वॉटर प्युरिफायर, हॅन्ड वॉश बेसिन बसविणे हे काम अत्यावश्यक व तातडीचे असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ६७ (३)(क) अन्वये करणेसाठी खालील बाब मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करणेत येत आहे.

१. पुणे महानगरपालिका झोन क्र. ४ कोंढवा-येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालयाचे अंतर्गत सिंहगड वसतीगृह येवलेवाडी, ट्रिनिटी कॉलेज वसहतीगृह, कै.दरेकर शाळा, कोंढवा बु, सिंहगड शाळा टिळेकरनगर येथे स्थापित केलेल्या केंद्रासाठी वॉटर प्युरिफायर, हॅन्ड वॉश बेसिन पुरविणे व बसविणे इत्यादि कामे करून घेणस व झालेल्या कामाचे बिले G.S.T, अन्य करांसहित खालील अर्थशिर्षकामधून आदा करणे.

''सन २०२०-२१ चे अंदाजपत्रक

महसुली कामांसाठी -RE17F257

Covid-19 अंतर्गत आवश्यक महसुली कामांसाठी (खर्च)

२.मे. राजवीर कन्स्ट्रक्शन यांचेशी करार करुन दि.२/७/२०२० पासून केलेल्या कामाचे बिल आदा करणेस.

३.वरील अ.क्र. १ व २ ची अंमलबजावणी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७ (३) (क) नुसार करणेस

विषय क्र.१६/१४९

संदर्भ – १) साथरोग अधिनियम १८९७ ची अमलबजावणी सुरू झाल्याबाबतची अधिसुचना दि.१३/०३/२०२०.
२) महाराष्ट्र कोविड-१९ उपाययोजना नियम २०२०.
३) केंद्रीय आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५.
४) महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३)(क)
५) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/प.क्र.४/३६२ दि.१३/१०/२०२० चे पत्र.
६) मा.स्थायी समिती ठराव क्र.६७७,दि.२०/१०/२०२०

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून -

पुणे महानगरपालिका झोन क्र. ४ कोंढवा-येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालयाचे अंतर्गत कै.दरेकर शाळा, कोंढवा बु, सिंहगड शाळा टिळेकरनगर व अन्य ठिकाणी स्थापित केलेल्या आयसोलेशन/क्वारंटाईन/ CCC केंद्रासाठी विविध स्थापत्य विषयक कामे मे. समर्थ कन्स्ट्रक्शन या एजन्सी कडून दि.१५/०६/२०२० पासून काम करून घेणस व सदरचे काम तातडीचे असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ६७ (३)(क) अन्वये करणेसाठी खालील बाब मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करणेत येत आहे.

